# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 17 June 2024
## Time: 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १७ जून २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **राज्यात काही सामाजिक संस्थांमध्ये शहरी नक्षलवादाची घुसखोरी–मुख्यमंत्र्यांचा आरोप**
- **एसटी महामंडळाच्या पास थेट तुमच्या शाळेत मोहिमेला उद्यापासून प्रारंभ**
- **सीईटीचा निकाल जाहीर–राज्यात ३७ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाईल**
- **आज बकरी ईदनिमित्तानं विशेष नमाजसह धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन**

**आणि**

- **पाणी प्रश्नी मराठवाड्यातल्या लोकप्रतिनिधींनी एकत्र येण्याचं मंथन परिषदेतून आवाहन**

***सविस्तर बातम्या***

राज्यात काही सामाजिक संस्थांमध्ये शहरी नक्षलवादानं घुसखोरी केल्याचा आरोप मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी केला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातील महायुतीच्या प्रचारासाठी विजय संकल्प मेळावा काल झाला, त्यात मुख्यमंत्री बोलत होते. याच संस्थांच्या सहाय्याने महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत खोटं नरेटिव्ह निर्माण केल्याचा आरोप शिंदे यांनी केला. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी विकासाचं खरं नरेटिव्ह निर्माण करण्याचं आवाहन शिंदे यांनी केलं.

****

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीमध्ये ८५ ते ९० जागा मागणार असल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सांगितलं आहे. ते काल गोंदिया इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला अपेक्षित यश मिळालं नसलं, तरी विधानसभा निवडणुकीत चित्र बदलेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होणार असल्याचं पटेल यांनी यावेळी सांगितलं.

****

पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे यांनीही आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून योग्य जागा मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ते काल ठाण्यात बातमीदाराशी बोलत होते. योग्य जागा मिळाल्या नाहीत तर आपण राज्यात ३० जागांवर निवडणूक लढणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्य मंत्रिमंडळात एक कॅबिनेट मंत्री, एक राज्यमंत्री आणि एका महामंडळात आपल्या पक्षाला प्रतिनिधित्व द्यावं, अशी मागणीही कवाडे यांनी केली आहे.

****

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र कशाशीही जोडलेलं नसतं, त्यामुळे अनलॉक करण्यासाठी त्याला ओटीपीची गरज लागत नसल्याचं, वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी स्पष्ट केलं आहे. या मतदारसंघात मतमोजणीवेळी ईव्हीएम अनलॉक करण्यासाठी लागणारा मोबाईल, शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या नातलगाकडे असल्याची चर्चा सुरू होती, त्या पार्श्वभूमीवर त्या काल वार्ताहर परिषदेत बोलत होत्या. सदर मोबाईल हा डेटा एन्ट्रीशी संबंधित असून, याप्रकरणी नोंदवलेल्या गुन्ह्याचा तपास सुरू असल्याचं सूर्यवंशी यांनी सांगितलं.

****

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या एमएचटी – सीईटी परिक्षेचा निकाल काल जाहीर झाला. या परिक्षेत पीसीबी आणि पीसीएम विषयगटात ३७ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल मिळवल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्यभरातल्या शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनींना त्यांच्या शिक्षण संस्थेतच आवश्यकतेनुसार एसटीचा पास उपलब्ध करून दिला जाणार आहे. राज्यमार्ग परिवहन महामंडळ–एसटीचे उपाध्यक्ष तसंच व्यवस्थापकीय संचालक डॉ.

माधव कुसेकर यांनी संबंधितांना याबाबत सूचना दिल्या आहेत. यासाठी 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम उद्या १८ जूनपासून राज्यभरात राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना पासच्या माध्यमातून प्रवासभाड्यात ६६ टक्के सवलत दिली जाते तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पास दिला जातो.

छत्रपती संभाजीनगर इथं एसटी महामंडळाने शनिवारपासूनच या पासवाटप उपक्रमाला सुरुवात केली. जिल्ह्यात चौका इथल्या न्यू हायस्कूल इथं एसटीचे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर, आगार व्यवस्थापक संगीता सूर्यवंशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पासवाटप करण्यात आलं.

****

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या एमएचटी – सीईटी परिक्षेचा निकाल काल जाहीर झाला. या परिक्षेत पीसीबी आणि पीसीएम विषयगटात ३७ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल मिळवल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

१८ व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल दुसऱ्या दिवशी डॉक फिल्म बाजारचं उद्घाटन करण्यात आलं. यंदा पहिल्यांदाच भरवण्यात आलेल्या या डॉक फिल्म बाजारचं, वेब सीरीज निर्मात्या आणि एमी पुरस्कार विजेत्या अपूर्वा बक्षी यांच्या हस्ते उद्घाटन झालं.नवोदित माहितीपट निर्मात्यांसाठी एक व्यासपीठ या प्रदर्शनामुळे उपलब्ध झालं आहे.

****

पवित्र अमरनाथ यात्रा या महिन्याच्या २९ तारखेला सुरू होणार असून, १९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठकीत सुरक्षेसह सर्व व्यवस्थांचा आढावा घेतला.

दरम्यान, गंगा दशहरा पर्वाची काल सांगता झाली. यानिमित्त देशभरातल्या भाविकांनी गंगाकाठावरील प्रयागराज, वाराणसी, हरिद्वारसह विविध घाटांवर मोठी गर्दी केली आहे.

****

ईद – उल – अजा अर्थात बकरी ईदचा पवित्र सण आज सर्वत्र साजरा होत आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी बकरी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो, या सणानिमित्त उदात्त मूल्यांच्या

जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राज्यपालांनी आपल्या संदेशातून केलं आहे.

ऽबकरी ईद निमित्तानं आज सामुहिक विशेष नमाजसह विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं या सणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून सर्व नियोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी हा सण शांततामय वातावरणात साजरा करण्याचं आवाहन पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी केलं आहे...

**सण साजरे करताना शांतता आणि सौहार्द्र जपणे आवश्यक आहे. सर्वांनी कायद्याचे पालन करने आणि एकमेकांचा आदर राखणे हे आपले कर्तव्य आहे. सण उत्सवामध्ये कोणताही अनुचित प्रकार होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. आपण सर्वांनी एकत्र येऊन अशा सण उत्सवाच्या काळामध्ये कुणीही आक्षेपार्ह पोस्ट किंवा वर्तन करुन सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करु नये.**

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पादहस्तासनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर प्रसारित केली आहे. पाठीचा कणा लवचिक होण्यासाठी या आसनाचा सर्वांनी सराव करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

दरम्यान, सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पदाची शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० जूनला आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमात देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १११ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा माय गोव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल मराठवाडा जलसमृद्धी प्रतिष्ठान, टीम ऑफ असोसिएशन, मासिआ, शेतकरी सहकारी पाणी वापर संस्था आणि साखर कारखान्यार्फे मराठवाड्यातल्या पाणी प्रश्नावर मंथन परिषद पार पडली. खासदार संदीपान भुमरे, खासदार भागवत कराड, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, जालन्याचे

खासदार कल्याण काळे, आमदार राजेश टोपे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मराठवाड्याला हक्काचं पाणी मिळण्यासाठी आणि विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी मराठवाड्यातल्या सर्व आमदार खासदारांनी पक्षीय मतभेद बाजुला ठेऊन एकत्र यावं, मराठवाड्याच्या हितासाठी जनआंदोलन उभं करणं गरजेचं असल्याचं मत या परिषदेत माडंण्यात आलं.

****

मराठवाड्यात धोरणात्मक गुंतवणूक आणि औद्योगिक विकासासंदर्भात चर्चेसाठी छत्रपती संभाजीनगर इथं 'विकसित मराठवाडा २०४७'या एक दिवसीय चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या १९ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी पाच या वेळेत बीड वळण रस्त्यावरच्या एमआयटी महाविद्यालयात हे एक दिवसीय चर्चासत्र होणार आहे.

****

धाराशिवसह महाराष्ट्रात आणि पर्यायानं देशात शेतकऱ्यांसाठी विशेषत: महिला शेतकऱ्यांसाठीच्या योजना राबवण्यावर भर देण्याचा मानस, इफ्कोच्या संचालक डॉक्टर वर्षा कस्तुरकर यांनी व्यक्त केला आहे. इफ्कोच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल कस्तुरकर यांचा काल धाराशिव इथं, सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. देशपातळीवरील सर्वात मोठ्या सहकारी संस्थेची संचालक म्हणून काम करण्याची संधी सहकार भारतीमुळे मिळाल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. पाचपोर यांनी यावेळी बोलतांना, राज्यात सहकार क्षेत्र समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी राबवत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

****

महिला क्रिकेटमधे बंगळुरु इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर १४३ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं स्मृती मंधानाच्या शतकी खेळीच्या बळावर निर्धारित षटकात आठ बाद २६५ धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ ३८ व्या षटकातच १२२ धावात सर्वबाद झाला.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल ऑस्ट्रेलियानं स्कॉटलंडचा पाच गडी राखून, तर पाकिस्ताननं आयर्लंडचा तीन गडी राखून पराभव केला. आज या स्पर्धेत बांग्लादेश विरुद्ध नेपाळ, आणि श्रीलंका विरुद्ध नेदरलँड्स हे सामने सुरु आहेत.
लातूर जिल्ह्यातल्या इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक दाखले –प्रमाणपत्रं त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यासाठी येत्या १८ जून ते दोन जुलैदरम्यान महाराजस्व अभियान राबवलं जाणार आहे. लातूर तालुक्यात या कालावधीत ६६ महा ई–सेवा केंद्रांद्वारे लातूरच्या दहा शाळा, अन्य आठ महसूल मंडळात होणाऱ्या शिबिरांतून दहा हजार प्रमाणपत्रं वितरणाचं प्रशासनाचं उद्दीष्ट आहे.

****

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या चार पाच दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

****